# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** शासन निर्णय क्र. नामपा-२०१५/प्र.क्र. १६६/नवि-२६ **{सामान्य प्रशासन विभाग}** दि. १२/०५/२०१७ व शासन निर्णय क्र. नामपा-२०१५/१६५२/प्र.क्र. १६६/नवि-२६ दि. १८/०३/२०२१ अन्वये विभागातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे १४ संवर्गांचे सेवाप्रवेश नियम मंजुर आहेत.

विभागाने वेगवेगळया सवंर्गातील सरळसेवेचे ३५० रिक्त पदांची जाहिरात प्रसिध्दी केली आहे. त्या अनुषंगाने शासन पत्र क्र. मअसे/३२-एफ/१९३४ दि. २२ डिसेंबर, २०२३ विभागास प्राप्त झाले आहे. ज्यामध्ये त्यांनी नागपूर महानगरपालिकेतील अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाचे सेवा प्रवेश नियमामध्ये महिलांसाठी उंची व वजन किमान पात्रता १६२ से.मी. व ५० कि. ग्रॅ. असुन त्याऐवजी १५७ से.मी. व ४६ कि.ग्रॅ. असावी याबाबत सुचित केलेले आहे. तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई येथे तरुण पदवीधर बेरोजगार उमेदवारांसाठी उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम आयोजित करण्यात येते. तसेच राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर येथेही खाजगी उमेदवारांसाठी सब-ऑफिसर पाठ्यक्रम आयोजीत करण्यात येते. सदर प्रशिक्षणांतर्गत अग्निशमन यंत्रणा राबविण्याकरीता प्रशिक्षीत मनुष्यबळ व रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून शासनाने महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीकडे जबाबदारी सोपविलेली आहे. त्यामुळे उप अग्निशमन अधिकारी हे पद Entry Level पद असल्याने सरळसेवेच्या उप अग्निशमन अधिकारी या पदाची अनुभवाची अट शिथिल करण्यात यावी, याबाबत मा. संचालक, अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी पत्राद्वारे सुचीत केले आहे.

त्यानुसार सरळसेवेच्या उप अग्निशमन अधिकारी या पदाकरीता अनुभव अर्हता आवश्यक नाही व सरळसेवेच्या महीला उमेदवारांकरीता उंची १५७ से.मी. तथा वजन ४६ कि. ग्रॅ., याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित आहे.

त्याचप्रमाणे सेवा प्रवेश नियमातील काही कर्मचा-यांच्या संवर्गात जोखीम भत्ता अनुज्ञेय नाही. परंतु या पदातील कर्मचारी आगीच्या वर्दीवर अग्निशमनाचे कार्य करीत असल्यामुळे त्यांना जोखीम भत्ता अनुज्ञेय करणे आवश्यक आहे व इतर संवर्गामध्ये सुद्धा जोखिम भत्ता इतर महापालिकेच्या तुलनेत फारच कमी असल्याने यामध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

केंद्रीय गृह मंत्रालय भारत सरकार यांचे कार्यालयीन पत्र क्र. १-१२०१२/०६/२०१६-DGCD (F) प्रमाणे राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील बी.ई. फायर पदवीधर विद्यार्थी उत्तीर्ण होतात. सदर उच्च शिक्षित पदवीधर विद्यार्थ्यांना अग्निशमन सेवेत संधी उपलब्ध व्हावी याकरीता बी.ई. फायर पदवी हि शैक्षणिक अर्हता सेवा प्रवेश नियमात समाविष्ट करण्यात यावी, याप्रमाणे सुचीत केले आहे.

त्याअनुषंगाने राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर हे संपुर्ण देशात एकमेव महाविद्यालय असुन अखिल भारतीय संयुक्त प्रवेश परीक्षेच्या (जेईई मेन) आधारावर वर्षाकाठी फक्त ६० गुणवंत विद्यार्थ्यांची निवड होते. सदर अभ्यासक्रमाला AICTE महामंडळाची मान्यताप्राप्त असुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपुर विद्यापीठ द्वारा संचालित करण्यात येते. सदर पाठ्यक्रम निवासी स्वरुपाचा चार वर्ष कालावधीचा आहे. तसेच या पदवीधारकांना अग्निशमन सेवा कार्याच्या कार्यानुभवासाठी ६ महीने कालावधीसाठी देशातील इतर अग्निशमन सेवेमध्ये महाविद्यालयातर्फे पाठविले जातात. अशा अग्निशमन क्षेत्रातील उच्च शिक्षित विद्यार्थ्यांना भरती प्रक्रीयेच्या माध्यमातुन अग्निशमन सेवेत सरळसेवेने संधी उपलब्ध करुन देण्याकरीता बी.ई. फायर पदवी धारण केलेल्या उमेदवारांकरीता अग्निशमन केद्र अधिकारी या पदाकरीता (Entry Level) सेवाप्रवेश नियमात तरतुद करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने अग्निशमन विभागाचे विभागीय अग्निशमन अधिकारी, सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी व अग्निशमन केंद्र अधिकारी वर्गांचे शैक्षणिक अर्हतेत बी.ई फायर पदवी उत्तीर्ण केलेली असावी तसेच नामनिर्देशनाचे गट 'ब' श्रेणीतील "अग्निशमन केंद्र अधिकारी" या पदाकरीता शैक्षणिक अर्हतेत बी.ई फायर पदवीधर उमेदवारांसाठी अनुभवाची अट आवश्यक नाही याप्रमाणे सेवाप्रवेश नियमात तरतुद करण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता, अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे अस्तित्वात असलेल्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा/बदल करण्याचे प्रस्तावित आहे, ते खालील प्रमाणे-

**अग्निशमन व अपात्कालीन सेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी**
**(वर्गीकरण, सेवाभरती व पदोन्नती)**
**विनीयम-२००४ जोडपत्र-२, अनुसूची - अ**
**नागपुर महानगरपालिका, नागपुर**

| अनु क्र. | पदनाम | आकृतीबंधानुसार मंजुर पदे | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन / सरळसेवेने<br>२. पदोन्नतीने<br>३. प्रतिनियुक्तीने | अस्तित्वात असलेले सेवा प्रवेश नियम | अग्निशमन व अपात्कालीन सेवा विभाग, (वर्गीकरण व सेवाभरती व पदोन्नती) नियमात प्रस्तावित बदल |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **मुख्य अग्निशमन अधिकारी** | ०१ | १००% पदोन्नतीने ( प्रथम पाच वर्षासाठी) | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय यांचेकडील पदवी (बी. ई. फायर) धारण केलेली असवी **किंवा** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय यांचा डिव्हीजनल फायर ऑफिसर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केली असावी. **किंवा** दि. इन्टीटयुशनऑफ फायर इंजिनियअर्स (यु.के.) किंवा (इंडिया) या संस्थेकडील सदस्यत्व (एम.आय.-फायर) किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर दि इन्स्टिटयुशन ऑफ फायर इंजिनिअस्र (यु.के.) यांचे सदस्यत्व असावे.<br>३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) शारिरीक पात्रता :-**<br>1) नामनिद्रेशन : उमेदवाराचे वय वर्ष ५५ पेक्षा अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरील उमेदवाराला वयाची अट लागू नाही.<br>२) अग्निशमन सेवेत प्रशासकीय व ऑपरेशनल कामासाठी उमेदवाराची निरीगी व सुदृढ शरीरयष्टी असावी.<br>**क) अनुभव :-**<br>"अ +" वर्ग महानगरपालिकेतील उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किमान २ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. किंवा अ वर्ग महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरण/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. किंवा ब व क वर्ग महानगरपालिका/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान २ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी.<br>**ड) पदोन्नती :**<br>उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवापुर्ण झालेल्या तसेच वरील शैक्षणिक व शारिरीक अर्हता धारण करणारे अधिकारी सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नतीस पात्र. पदोन्नतीसाठी वयाची अट राहणार नाही.<br>**इ) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन -१५,६००-३९,१०० (ग्रे.वे.६,६००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**ई) भत्ते** : ऑनकाल पे रु. ३००/- जोखीम भत्ता रु. १५०/- युनिफार्म अपकीप रु. २००/-<br><br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :-** सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये १००% पदोन्नतीने (प्रथम ५ वर्षासाठी) | **जुना जोखीम भत्ता**: रु. १५०/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता**: रु १०००/- |
| २ | **उपमुख्य अग्निशमन अधिकारी** | ०१ | १००% पदोन्नतीने (प्रथम पाच वर्षासाठी) | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय यांचेकडील पदवी (बी. ई. फायर) धारण केलेली असवी **किंवा** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा डिव्हीजनल फायर ऑफिसर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केली असावी. **किंवा** दि. इन्टीटयुशनऑफ फायर इंजिनियअर्स (यु.के.) किंवा (इंडिया) या संस्थेकडील सदस्यत्व (एम.आय.-फायर) किंवा कोणत्याही शाखेची | **जुना जोखीम भत्ता**: रु. २००/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता**: रु १०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पदवी प्राप्त केल्यानंतर दि इन्स्टीटयुशन ऑफ फायर इंजिनिअर्स (यु.के.) यांचे सभा सदस्यत्व असावे.<br>३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br><br>**ब) शारिरीक पात्रता :-**<br>1) नामनिद्रेशन : उमेदवाराचे वय वर्ष ५० पेक्षा अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरील उमेदवाराला वयाची अट लागू नाही.<br>२) अग्निशमन सेवेत प्रशासकीय व ऑपरेशनल कामासाठी उमेदवाराची निरीगी व सुदृढ शरीरयष्टी असावी.<br>**क) अनुभव :-**<br>"अ +" वर्ग महानगरपालिकेतील विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किमान २ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. **किंवा** अ वर्ग महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरण/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. **किंवा** ब व क वर्ग महानगरपालिका/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान २ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. किंवा ड वर्ग महानगरपालिका/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ४ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी.<br>**ड) पदोन्नती :**<br>विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवापुर्ण झालेल्या तसेच वरील शैक्षणिक व शारिरीक अर्हता धारण करणारे अधिकारी सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नतीस पात्र. पदोन्नतीसाठी वयाची अट राहणार नाही.<br><br>**इ) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन -१५,६००-३९,१०० (ग्रे.वे.५,४००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**ई) भत्ते** : ऑनकाल पे रु. ३००/- जोखीम भत्ता रु. २००/- युनिफार्म अपकीप रु. २००/-<br><br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :**- सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>१००% पदोन्नतीने<br>(प्रथम ५ वर्षाकरीता) | |
| **३** | **विभागीय अग्निशमन अधिकारी** | ०२ | १.नामनिर्देशन/ सरळसेवेने - ५०%<br>२. पदोन्नती - ५०%<br>(प्रथम पाच वर्षाकरिता १००% पदोन्नती) | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा डिव्हीजनल फायर ऑफिसर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केली असावी. **किंवा** दि. इन्टीटयुशनऑफ फायर इंजिनियअर्स (यु.के.) किंवा (इंडिया) या संस्थेकडील सदस्यत्व (एम.आय.-फायर) किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर दि इन्स्टिटयुशन ऑफ फायर इंजिनिअर्स (यु.के.) यांचे सदस्यत्व असावे.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) अनुभव :-**<br>"अ +" वर्ग महानगरपालिकेतील सहा. विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किमान २ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. **किंवा** अ वर्ग महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरण/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये सहा. विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. **किंवा** ब व क वर्ग महानगरपालिकेमध्ये विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान २ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. किंवा ड वर्ग महानगरपालिका/ मुख्य अग्निशमन अधिकारी/ उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान २ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी.<br>क) वयोमर्यादा : नामनिर्देशनाचा उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असू नये. प्रति नियुक्ती वरील उमेदवाराला वयाची अट लागू नाही.<br>**ड) पदोन्नती :**<br>सहा. विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवापुर्ण झालेल्या तसेच वरील शैक्षणिक पात्रता असणा-या | **शैक्षणिक पात्रता :**<br>**<u>मुद्या क्र. २ मध्ये</u>**<br>**किंवा** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय यांचेकडील पदवी (बी. ई. फायर) धारण केलेली असावी. याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित आहे.<br><br>**जुना जोखीम भत्ता**: रु. १५०/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता**: रु १०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अधिका-यांच्या सेवा जेष्ठता अधिन पात्रता या निकषावर नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**इ) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन -९,३००-३४,८०० (ग्रे.वे.४,८००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**ई) भत्ते** : ऑनकाल पे रु. २००/- जोखीम भत्ता रु. १५०/- युनिफार्म अपकीप रु. २००/-<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :-** सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>१) नामनिर्देशन/ सरळसेवेने ५०%<br>२) पदोन्नती ५०%<br>(प्रथम ५ वर्षाकरीता १००% पदोन्नती) | |
| ४ | **सहा. विभागीय अग्निशमन अधिकारी** | ०४ | १.नामनिर्देशन/ सरळसेवेने - २५%<br>२. पदोन्नती - ७५%<br>(प्रथम पाच वर्षाकरिता १००% पदोन्नती) | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा डिव्हीजनल फायर ऑफिसर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केली असावी.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) अनुभव :-**<br>"अ +" वर्ग महानगरपालिकेतील अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किमान २ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. **किंवा** अ वर्ग महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरण/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. **किंवा** ब व क वर्ग महानगरपालिका शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये सहा. विभागी अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. किंवा ड वर्ग महानगरपालिका/ विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी.<br>क) वयोमर्यादा- शारिरीक पात्रता : १) नामनिर्देशनाचा उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असू नये. २) शासकिय /निमशासकीय अगिनशमन सेवेमध्ये काग्ररत असणा-या कर्मचा-यांसाठी वयाची अट ४५ वर्षापर्यंत शिथिल राहील. प्रति नियुक्ती वरील उमेदवाराला वयाची अट लागू नाही.<br>३) अग्निशमन सेवेत प्रशासकीय व ऑपरेशन्ल कामासाठी उमेदवाराची निरोगी व सुदृढ शरीरयष्टी असावी.<br>**ड) पदोन्नती :**<br>अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवापुर्ण करीत असलेल्या व उपरोक्त अर्हता प्राप्त करणा-या अधिका-यांची जेष्ठता अधिन पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. जर राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर यांचा डिव्हीजन्ल फायर ऑफिसर कोर्स पुर्ण केलेला नसेल तर उमेदवारांना पदोन्नतीनंतर ३ वर्षात डिव्हिजन्ल फायर ऑफिसर कोर्स पुर्ण करणे आवश्यक राहील.पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**इ) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन -९,३००-३४,८०० (ग्रे.वे.४,६००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**फ) भत्ते** : ऑनकाल पे रु. २००/- जोखीम भत्ता रु. १५०/- युनिफार्म अपकीप रु. २००/-<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :-** सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>१) नामनिर्देशन ५०%<br>२) पदोन्नती ५०% | अ) **शैक्षणिक पात्रता:**<br>**<u>मुद्या क्र. २ मध्ये-</u>**<br>**किंवा** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय यांचेकडील पदवी (बी. ई. फायर) धारण केलेली असावी. याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित.<br><br>**जुना जोखीम भत्ता**: रु. १५०/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता**: रु १०००/- |
| ५ | **अग्निशमन केंद्र अधिकारी** | १५ | १.नामनिर्देशन/ सरळसेवेने - ५०%<br>२. पदोन्नती - ५०% | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा स्टेशन ऑफिसर ॲण्ड इन्स्ट्रक्टर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील पदविका) उत्तीर्ण असावा. **किंवा** महाराष्ट्र अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र शासन येथील १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पुर्ण केलेला असावा. **किंवा** दि. इन्टीटयुशन ऑफ फायर इंजिनियअर्स (यु.के.) किंवा (इंडिया) या संस्थेकडून ग्रेड आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा. | अ) **शैक्षणिक पात्रता:**<br>**<u>मुद्या क्र. २ मध्ये</u>**<br>**किंवा** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय यांचेकडील पदवी (बी. ई. फायर) धारण केलेली असावी. याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित आहे.<br>क) **अनुभव:-** राष्ट्रीय अग्निशमन सेवा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **ब) किमान शारिरीक पात्रता :**<br>अ) उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी १६२ से.मी.)<br>ब) छाती : साधारण ८१ से.मी. – फुगवून ५ से.मी. जास्त<br>(महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>क) वजन – ५० कि.ग्रॅ.<br>ख) दृष्टी - चांगली<br>क) **अनुभव :-**<br>"अ +" वर्ग महानगरपालिकेतील सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. **किंवा** अ वर्ग महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरण/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ४ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. **किंवा** ब व क वर्ग महानगरपालिकेमध्ये अग्निशमन सेवेमध्ये अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. किंवा ड वर्ग महानगरपालिके मध्ये अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ४ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी.<br>**ड) वयोमर्यादा** :<br>१) सरळसेवेच्या उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>२) शासकिय /निमशासकीय अगिनशमन सेवेमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांसाठी वयाची अट लागू रहाणार नाही.<br>**इ) पदोन्नती :**<br>सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष नियमित सेवा पुर्ण करीत असलेल्या व उपरोक्त अर्हता प्राप्त करणा-या अधिका-यांची जेष्ठता अधिन पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. जर राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर यांचा स्टेशन ऑफिसर ॲण्ड इन्सट्रक्टर कोर्स पुर्ण केलेला नसेल तर उमेदवारांना पदोन्नती झाल्यापासून ३ वर्षात कोर्स पुर्ण करणे आवश्यक राहील.पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**ई) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन - ९,३००-३४,८०० (ग्रे.वे.४,४००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**उ) भत्ते** : ऑनकाल पे रु. २००/- जोखीम भत्ता रु. १५०/- युनिफार्म अपकीप रु. २००/-<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी** :- सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>१) नामनिर्देशन – २५%<br>२) पदोन्नती ७५%<br>(प्रथम ५ वर्षाकरीता १००% पदोन्नती) | महाविद्यालय यांचेकडील पदवी (बी. ई. फायर) धारण केलेल्या नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणा-या उमेदवाराला अनुभव अर्हता शिथिल राहील, याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित आहे.<br><br>**उ) जुना जोखीम भत्ता:** रु. १५०/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता:** रु ९००/- |
| ६ | **सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी** | ३९ | १.नामनिर्देशन/ सरळसेवेने - २५%<br>२. पदोन्नती - ७५%<br>(प्रथम पाच वर्षाकरिता १००% पदोन्नती) | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा स्टेशन ऑफिसर ॲण्ड इन्स्ट्रक्टर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील पदविका) उत्तीर्ण असावा. **किंवा** महाराष्ट्र अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र शासन येथील १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पुर्ण केलेला असावा. **किंवा** दि. इन्टीटयुशन ऑफ फायर इंजिनियअर्स (यु.के.) किंवा (इंडिया) या संस्थेकडून ग्रेड आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) किमान शारिरीक पात्रता :**<br>अ) उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी १६२ से.मी.)<br>ब) छाती : साधारण ८१ से.मी. – फुगवून ५ से.मी. जास्त<br>(महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>ग) वजन – ५० कि.ग्रॅ.<br>घ) दृष्टी - चांगली<br>क) **अनुभव :-**<br>अ वर्ग महानगरपालिका / महानगरपालिका/ विशेष नियोजन प्राधिकरण/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये उप अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी. **किंवा** ब व क वर्ग महानगरपालिकेमध्ये उप अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ५ वर्ष सेवा पुर्ण केलेली असावी.<br>**ड) वयोमर्यादा** : | **जुना जोखीम भत्ता:** रु. १५०/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता:** रु ९००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | १) सरळसेवेच्या उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>२) शासकिय /निमशासकीय अगिनशमन सेवेमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांसाठी वयाची अट लागू रहाणार नाही.<br>**इ) पदोन्नती :**<br>उप अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष नियमित सेवा पुर्ण करीत असलेल्या व उपरोक्त अर्हता प्राप्त करणा-या अधिका-यांची जेष्ठता अधिन पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**ई) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन - ९,३००-३४,८०० (ग्रे.वे.४,३००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**उ) भत्ते** : ऑनकाल पे रु. २००/- जोखीम भत्ता रु. १५०/- युनिफार्म अपकीप रु. २००/-<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :**- सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>१) नामनिर्देशन – २५%<br>२) पदोन्नती ७५%<br>(प्रथम ५ वर्षाकरीता १००% पदोन्नती) | |
| ७ | **उप अग्निशमन अधिकारी :** | ३९ | १.नामनिर्देशन/ सरळसेवेने - २५%<br>२. पदोन्नती - ७५%<br>(प्रथम पाच वर्षाकरिता १००% पदोन्नतीने पदे भरण्यांत येतील यांत ८० टक्के प्रमुख अग्निशमन विमोचक व २० टक्के चालक यंत्र चालक / जुने पदनाम "अग्निक ड्रायव्हर संवर्गातुन पदोन्नतीने करण्यांत येतील" | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा उप अग्निशमन अधिकारी हा पाठयक्रम पुर्ण केलेला असावा. **किंवा** महाराष्ट्र अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र शासन येथील १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पुर्ण केलेला असावा. **किंवा** दि. इन्टीटयुशन ऑफ फायर इंजिनियअर्स (यु.के.) किंवा (इंडिया) या संस्थेकडून ग्रेड आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) किमान शारिरीक पात्रता :**<br>अ) उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी १६२ से.मी.)<br>ब) छाती : साधारण ८१ से.मी. – फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>ड) वजन – ५० कि.ग्रॅ.<br>च) दृष्टी - चांगली<br>क) **अनुभव :-**<br>ब व क वर्ग महानगरपालिकेमध्ये प्रमुख अग्निशमन विमोचक या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ५ वर्ष नियमित सेवा पुर्ण केलेली असावी. किंवा ड वर्ग महानगरपालिकेमध्ये प्रमुख अग्निशमन विमोचक या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ७ वर्ष नियमित सेवा पुर्ण केलेली असावी.<br>**ड) वयोमर्यादा** :<br>१) सरळसेवेच्या उमेदवाराचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>२) शासकिय / निमशासकीय अगिनशमन सेवेमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांसाठी वयाची अट ४५ वर्षापर्यंत शिथिल राहील.<br>**इ) पदोन्नती :**<br>प्रमुख अग्निशमन विमोचक किंवा चालक यंत्रचालक या पदावर नियमित ३ वर्ष नियमित सेवा पुर्ण झालेल्या व वरील शैक्षणिक व शारीरिक अर्हता प्राप्त करणा-या अधिका-यांची जेष्ठता अधिन पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**ई) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन - ९,३००-३४,८०० (ग्रे.वे.४,२००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**उ) भत्ते** : ऑनकाल पे रु. २००/- जोखीम भत्ता रु. १५०/- युनिफार्म अपकीप रु. २००/-<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :**- सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>१) नामनिर्देशन – ५०%<br>२) पदोन्नती ५०%<br>(प्रथम ५ वर्षाकरीता ८०% अग्निशामक विमोचक व २०% यंत्रचालक पदोन्नतीने) | शासन पत्र क्र. मअसे-२०२३-३२-एफ/१९३४, दि. २२ डिसेबंर २०२३ व मअसे-२०१९/१०/१६४७, दि. २२ ऑक्टोंबर २०१९ अन्वये<br>**क) अनुभव :** नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणा-या उमेदवाराला अनुभव अर्हता आवश्यक नाही. याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित आहे.<br>**उ) जुना जोखीम भत्ता**: रु. १५०/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता**: रु ८००/- |
| ८ | **प्रमुख अग्निशामक** | ८१ | नामनिर्देशन/<br>१. सरळसेवेने - ५०% | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबइ्र यांच्या ६ महिने | **जुना जोखीम भत्ता**: रु. १००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **विमोचक** | | २. पदोन्नती - ५०%<br>(प्रथम पाच वर्षाकरिता ८०% अग्निशमन विमोचक व २०% यंत्र चालक पदोन्नती) | कालावधीचा अग्निशामक प्रक्षिण पाठयक्रम पुर्ण केलेला असावा.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) किमान शारिरीक पात्रता :**<br>अ) उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी १६२ से.मी.)<br>ब) छाती : साधारण ८१ से.मी. – फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>छ) वजन – ५० कि.ग्रॅ.<br>ज) दृष्टी - चांगली<br>क) **अनुभव :-**<br>उमेदवार शासकिय / निमशासकिय/ महानगरपालिकासह, विशेष नियोजन प्राधिकरणे या संस्थामधील अग्निशमन सेवेतील अग्निशामक विमोचक किंवा चालक यंत्रचालक या पदावर किमान ३ वर्ष कार्य केल्याचा अनुभव असावा.<br>**ड) वयोमर्यादा** :<br>१) उमेदवाराचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>**इ) पदोन्नती :**<br>अग्निशामक विमोचक या पदावर नियमित ३ वर्ष नियमित सेवा पुर्ण झालेल्या व वरील शैक्षणिक व शारीरिक अर्हंता प्राप्त करणा-या सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती किंवा किमान ७ वी उत्तीर्ण असलेले व अग्निशामक विमोचक या पदावर किमान १५ वर्ष नियमित सेवा पुर्ण केलेल्या कर्मचा-यांना सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**ई) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन – ५,२००-२०,००० (ग्रे.वे.२,८००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**उ) भत्ते** : ऑनकाल पे रु. १५०/- जोखीम भत्ता रु. १००/- युनिफार्म अपकीप रु. १५०/-<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :-** सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>१) नामनिर्देशन – ५०%<br>२) पदोन्नती ५०%<br>(प्रथम ५ वर्षाकरीता ८०% अग्निशामक विमोचक व २०% यंत्रचालक पदोन्नतीने) | **प्रस्तावित जोखीम भत्ता:** रु ७००/- |
| ९ | **चालक यंत्रचालक** | १६२ | १. नामनिर्देशन/ सरळसेवेने - ७५%<br>२. पदोन्नती - २५% | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) जड वाहन चालक म्हणून ३ वर्ष काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक .<br>३) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना<br>४) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>५) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबइर् यांच्या अग्निशामक प्रक्षिण पाठयक्रम पुर्ण केलेला असल्यास प्राधान्य.<br>**ब) किमान शारिरीक पात्रता :**<br>अ) उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी १६२ से.मी.)<br>ब) छाती : साधारण ८१ से.मी. – फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>झ) वजन – ५० कि.ग्रॅ.<br>ञ) दृष्टी - चांगली<br>क) **पाठयक्रम :-**<br>उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबइर् यांच्या पाठयक्रम पुर्ण केलेला नसेल तर त्या सदर प्रशिक्षण केंद्राचा ३ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पुर्ण करणे आवश्यक राहील.<br>**ड) वयोमर्यादा** :<br>१) उमेदवाराचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>**इ) पदोन्नती :**<br>अग्निशामक विमोचक किंवा वाहन चालक (अग्निशमन) या पदावर नियमित ३ वर्ष नियमित सेवा पुर्ण झालेल्या व वरील शैक्षणिक व शारीरिक अर्हंता प्राप्त करणा-या सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती किंवा किमान ७ वी उत्तीर्ण असलेले व अग्निशामक विमोचक किंवा वाहन चालक (अग्निशमन) या पदावर किमान १५ वर्ष नियमित सेवा पुर्ण केलेल्या कर्मचा-यांना सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती. पदोन्नतीसाठी वयाची | **जुना जोखीम भत्ता:** रु. १००/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता:** रु ७००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अट असणार नाही.<br>**ई) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन – ५,२००-२०,००० (ग्रे.वे.२,४००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**उ) भत्ते** : ऑनकाल पे रु. १५०/- जोखीम भत्ता रु. १००/- युनिफार्म अपकीप रु. १५०/-<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :-** सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>१) नामनिर्देशन – ७५%<br>२) पदोन्नती २५% | |
| **१०** | **वाहनचालक** | १० | नामनिर्देशन/ सरळसेवेने - १००% | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) वाहन चालक म्हणून ३ वर्ष काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक .<br>३) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना<br>४) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>५) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबइर् यांच्या अग्निशामक प्रक्षिण पाठयक्रम पुर्ण केलेला असल्यास प्राधान्य.<br>**ब) किमान शारिरीक पात्रता :**<br>अ) उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी १६२ से.मी.)<br>ब) छाती : साधारण ८१ से.मी. – फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>ट) वजन – ५० कि.ग्रॅ.<br>ठ) दृष्टी – चांगली<br>क) **पाठयक्रम :-**<br>उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबइर् यांच्या पाठयक्रम पुर्ण केलेला नसेल तर त्या सदर प्रशिक्षण केंद्राचा ३ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पुर्ण करणे आवश्यक राहील.<br>**ड) वयोमर्यादा** :<br>१) उमेदवाराचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>**इ) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन – ५,२००-२०,००० (ग्रे.वे.१,९००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**उ) भत्ते** : ऑनकाल पे रु. १००/- जोखीम भत्ता रु. १००/- युनिफार्म अपकीप रु. १००/-<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :-** सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>नामनिर्देशन – १००% | **जुना जोखीम भत्ता**: रु. १००/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता**: रु ७००/- |
| **११** | **अग्निशामक विमोचक** | ५०० | नामनिर्देशन/ सरळसेवेने - १००% | अ) **शैक्षणिक पात्रता :**<br>१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबइर् यांच्या अग्निशामक प्रक्षिण पाठयक्रम उत्तीर्ण असावा.<br>३) एम.एस.सी. आय.टी. उत्तीर्ण असावा.<br>४) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक.<br>**ब) किमान शारिरीक पात्रता :**<br>अ) उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी १६२ से.मी.)<br>ब) छाती : साधारण ८१ से.मी. – फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>क) वजन – ५० कि.ग्रॅ.<br>ड) दृष्टी - चांगली<br>**ड) वयोमर्यादा** :<br>१) उमेदवाराचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>**इ) वेतन** : ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन – ५,२००-२०,००० (ग्रे.वे.१,९००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**उ) भत्ते** : ऑनकाल पे रु. १००/- जोखीम भत्ता रु. १००/- युनिफार्म अपकीप रु. १००/-<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी** :- सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>नामनिर्देशन – १००% | शासन पत्र क्र. मअसे-२०२३-३२-एफ/१९३४, दि. २२ डिसेबंर २०२३ व मअसे-२०१९/१०/१६४७, दि. २२ ऑक्टोंबर २०१९ अन्वये<br>**प्रस्तावित :-**<br>**किमान शारिरीक पात्रता :**<br>अ) उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी १५७ से.मी. व वजन ४६ कि. ग्रॅ.) याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित.<br>ब) **जुना जोखीम भत्ता**: रु. १००/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता**: रु ७००/- |
| **१२** | **मुख्य मेक्यानि** | 01 | पदोन्नतीने - १००% | **पदोन्नती :** फिटर कम ड्रायव्हर या पदावर नियमित ३ वर्ष सेवा पुर्ण झालेल्या कर्मचा-यांच्या सेवा जेष्ठता व योग्यता अधिन पात्रता या निकषावर | **प्रस्तावित जोखीम भत्ता**: |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **क कम ड्रायव्हर** | | | पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :-** सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>पदोन्नतीने – १००% | रु ८००/- |
| **१३** | **फिटर कम ड्रायव्हर** | १५ | नामनिर्देशन/ सरळसेवेने - १००% | शैक्षणिक पात्रता :<br>१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) आय.टी.आय मधील मोटर मॅकेनिकल / डिझेल मॅकेनिकल/ समकक्ष कोर्स उत्तीर्ण असावा.<br>३) जड वाहन चालविण्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा.<br>४) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br>५) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे )<br>६) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण आवश्यक<br>७) वयोमयादा किमान १८ वर्ष व कमाल ३३ वर्ष . आरक्षित प्रवगा्रसाठी किमान १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष<br>नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :- सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>नामनिर्देशन – १००% | **प्रस्तावित जोखीम भत्ता:** रु ७००/- |
| **१४** | **इलेक्ट्रिशियन (ऑटो)** | ०२ | नामनिर्देशन/ सरळसेवेने - १००% | **शैक्षणिक पात्रता :**<br>१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) आय.टी.आय मधील इलेक्ट्रीशियन/समकक्ष कोर्स उत्तीर्ण असावा.<br>३) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br>४) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिणे, वाचणे व बोलणे )<br>५) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण आवश्यक<br>६) वयोमयादा किमान १८ वर्ष व कमाल ३३ वर्ष . आरक्षित प्रवगा्रसाठी किमान १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष<br>**नेमणूकीची पध्दत व टक्केवारी :-** सेवाप्रवेश नियम, जोडपत्र-२, अनुसुची – अ, स्तंभ ४ मध्ये<br>नामनिर्देशन – १००% | **जुना जोखीम भत्ता:** रु. १००/-<br>**प्रस्तावित जोखीम भत्ता:** रु ७००/- |
| १५ | **महिला उमेदवारा उंची व वजन** | **नागपूर महानगरपालिका नागपूर<br>अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी<br>(वर्गीकरण, सेवाभारती व पदोन्नती)<br>विनियम- २०१७<br>जोडपत्र -१<br>किमान शारिरीक पात्रता :-<br>अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील सर्व संवर्गातील महिला पदांसाठी उमेदवारांची शारिरीक पात्रता खालील प्रमाणे असणे आवश्यक आहे.<br>१. उंची :- १६२ से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची १६२ से.मि.)<br>२. वजन :- ५० किलो ग्रॅम** | | | शासन पत्र क्र. मअसे-२०२३-३२-एफ/१९३४, दि. २२ डिसेंबर २०२३ व मअसे-२०१९/१०/१६४७, दि. २२ ऑक्टोंबर २०१९ प्रमाणे महिला उमेदवारांसाठी उंची १५७ से.मी. व वजन ४६ कि.ग्रॅ. याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित आहे. |

उपरोक्त प्रमाणे नागपूर महानगरपालिका अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातील अधिकारी / कर्मचारी संवर्गाचे अस्तित्वात असलेल्या सेवा प्रवेश नियमात अनु क्र. ०१ ते १५ मध्ये नमूद सुधारणा करण्याचे विषयास शासना तर्फे मंजुरी प्राप्त करुन घेण्याचा विषय विचारात घेणे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 74/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 08/07/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार शासन निर्णय क्र. नामपा-२०१५/प्र.क्र. १६६/नवि-२६दि. १२/०५/२०१७ व शासन निर्णय क्र. नामपा-

२०१५/१६५२/प्र.क्र. १६६/नवि-२६ दि. १८/०३/२०२१ अन्वये विभागातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे १४ संवर्गांचे सेवाप्रवेश नियम मंजुर आहेत.

विभागाने वेगवेगळया सवंर्गातील सरळसेवेचे ३५० रिक्त पदांची जाहिरात प्रसिध्दी केली आहे. त्या अनुषंगाने शासन पत्र क्र. मअसे/३२-एफ/१९३४ दि. २२ डिसेंबर, २०२३ विभागास प्राप्त झाले आहे. ज्यामध्ये त्यांनी नागपूर महानगरपालिकेतील अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाचे सेवा प्रवेश नियमामध्ये महिलांसाठी उंची व वजन किमान पात्रता १६२ से.मी. व ५० कि. ग्रॅ. असुन त्याऐवजी १५७ से.मी. व ४६ कि.ग्रॅ. असावी याबाबत सुचित केलेले आहे. तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई येथे तरुण पदवीधर बेरोजगार उमेदवारांसाठी उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम आयोजित करण्यात येते. तसेच राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर येथेही खाजगी उमेदवारांसाठी सब-ऑफिसर पाठ्यक्रम आयोजीत करण्यात येते. सदर प्रशिक्षणांतर्गत अग्निशमन यंत्रणा राबविण्याकरीता प्रशिक्षीत मनुष्यबळ व रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून शासनाने महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीकडे जबाबदारी सोपविलेली आहे. त्यामुळे उप अग्निशमन अधिकारी हे पद Entry Level पद असल्याने सरळसेवेच्या उप अग्निशमन अधिकारी या पदाची अनुभवाची अट शिथिल करण्यात यावी, याबाबत मा. संचालक, अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी पत्राद्वारे सुचीत केले आहे.

त्यानुसार सरळसेवेच्या उप अग्निशमन अधिकारी या पदाकरीता अनुभव अर्हता आवश्यक नाही व सरळसेवेच्या महीला उमेदवारांकरीता उंची १५७ से.मी. तथा वजन ४६ कि. ग्रॅ., याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित आहे.

